REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 7 | ISSUE - 11 | AUGUST - 2018

# ''प्राथमिक शाळेतील इयत्ता पाचवीमधील विद्यार्थ्यांच्या मराठी शुध्दलेखनात होणाऱ्या चुकांचा शोध व त्यावर उपाययोजना सुचविणे''

डॉ. शशिकांत लक्ष्मण तांबे
एम.ए.,एम.एड्.,एम.फिल.,पीएच.डी.
प्र.प्राचार्य, जय जगदंबा शिक्षणशास्त्र महाविद्यालय, वैराग.

## १) प्रास्ताविक



माणसाच्या मनात आलेला विचार दुसऱ्याला कळवायचा असेल तर माणूस काय करतो? तो तोंडाने बोलून दाखवितो व्यक्तीला भूक लागली तर व्यक्ती म्हणते, ''मला भूक लागली आहे'' हे जे आपले बोलणे आहे. त्यालाच भाषा म्हणतात. मुका मुलगा हीच गोष्ट खूणेने सांगतो. पशू पक्षी निरनिराळे आवाज करून सांगतात. या सर्व त्यांच्या भाषा आहेत. ज्याला आपले विचार सांगावयाचे तो मनुष्य दूर अंतरावर किंवा परगावी असला तर तुम्हाला जे म्हणायचे असते ते तुम्ही त्याला लिहून कळवतात. अशा प्रकारे आपण आपल्या मनातले विचार लिहून किंवा बोलून दाखवितो तिलाच 'भाषा' असे म्हणतात. याचा लहान पणापासून सखोल अभ्यास केला तर लेखनात चुका होणार नाहीत.

आपण सर्वजन लहान पणापासून बोलायला शिकतो. आपल्या बोण्याचा अर्थ दुसऱ्याला समजलापाहिजे व दुसऱ्याचे आपल्याला समजले पाहिजे. यासाठी भाषा ही ठराविक पध्दतीने बोलली किंवा लिहिली गेली पाहिजे. समजा एखादी मुलगी म्हणाली ''मी आहो'' तर आपण हसतो का बरे? मुलगी असेल तर तिने ''मी आले'' असे म्हटलं पाहिजे. मुलगा असेल तर मी आलो असे म्हणावे तसेच मुल आली, मुली आल्या, मुलगे आले, अशा ठरलेल्या पध्दतीने बोलले तर आपली भाषा शुध्द समजतात नाही तरअशुध्द ठरते.भाषेचा व्यवहार नीट चालावा म्हणून यासंबंधिचे काही नियम ठरविण्यात आहे आहेत. या नियमानांच व्याकरण म्हणतात. या व्याकरणाचे ज्ञान सखोल असल्यास मराठी लेखनातचुका होणार नाहीत.

आपण जी भाषा बोलतो. ती आपल्याला शुध्द रीतिने बोलता व लिहिता आली पाहिजे. यासाठी मराठी भाषेच्या व्याकरणाची ओळख विद्यार्थ्यांनी करून घेतली पाहिजे. विद्यार्थी जो लिहितो ते शुध्द असावे म्हणून लेखनाच्या बाबतीत काही नियम ठरविण्यात आले जे आपण लिहितो ते शुध्द असावे म्हणून लेखनाच्या बाबतीत काही नियम ठनरविण्यात आले. जे आपण लिहितो त्यातील कोणत्या अक्षरांवर अनुस्वार द्यावेत याबाबतचे नियम आहेत. तसेच शब्दातील कोणती अक्षरे ऱ्हास्व लिहावीत व कोणती अक्षरे दीर्घ लिहावीत याबाबतचे नियम आहेत. या नियमाप्रमाणे लेखन केल्यास शुध्दलेखनात चुका होणार नाहीत.

प्रत्येक देशातील समाजाने शिक्षण हे समाज विकासाचे माध्यम मानले आहे. म्हणून शिक्षणाला महत्व दिले आहे. भारतीय संस्कृतीत तर शिक्षणाला व ज्ञानाला मानवाचा तिसरा डोळा मानले आहे. प्राचीन काळातील गुरूकुल पध्दती व कुटुंब पध्दती व कुटुंबातील व्यावसायिक शिक्षण पध्दतीत बदलणाऱ्या समाज व्यवस्थेनुसार व कुटुंब व्यवस्थेनुसार सतत बदल झाले आणि शाळा नावाच्या सामाजिक संस्थेची समाजाने उभारणी केली आहे.त्यातून लेखन, वाचन व गणन यांचे शिक्षण देण्याची सोय झाली. शिक्षणाची

समाजासाठी उपयुक्तता या निकषाऐवजी विद्यार्थ्यांच्या व्यक्तीगत बुध्दीचा विकास आणि तो ही शाब्दिक माधमातून असा निकष झाला.

भारतामध्ये शिक्षण देताना प्रत्येकाची मातृभाषा ही प्रथम भाषा म्हणून ओळखली जाते. हिंदी राष्ट्रीय भाषा व इंग्रजी आंतरराष्ट्रीय भाषा म्हणून मान्यता पावल्या. महाराष्ट्रामध्ये मराठी भाषेचा मातृभाषा म्हणून वापर करतात. इंग्रज भरतात आले आणि त्यांनी इंग्रजीचे बीज भारतात रोवले. याचा परिणाम असा झाला की, महाराष्ट्रामध्ये लोक मराठीकडे दुर्लक्ष करू लागले. आजच्या विज्ञान युगामध्ये सर्वाचे लक्ष शैक्षणिक तंत्रविज्ञानाकडे वळले. त्यामुळे मराठीकडे सर्वाचे दुर्लक्ष होवू लागले. शिक्षकांनी, पालकांनी पाल्यांच्या लेखनाकडे लक्ष दिले जात नाही. त्यामुळे प्राथमिक स्तरावर ही दुरूस्ती न झालयामुळे शब्दांच्या वाक्यरचनेच्या चुका तशाच राहून जातात.

अध्ययन—अध्यापन हे मातृभाषेतूनच व्हावे याबाबतीत किमानपक्षी सैदधांतिक स्तरावर कोणाचेही दुमत असणार नाही. मराठीचे शिक्षण घेत असताना शिक्षक अगदी काटेकोरपणे शुध्दलेखनाकडे लक्ष देत नसल्यामुळे व मराठीवर इंग्रजी व हिंदी भाषेचा प्रभाव पडत असलयाने विद्यार्थी सतत मराठी शुध्दलेखनात चुका करतो. मराठी शुध्दलेखनाचे नियम आधुनिक शैक्षणिक तंत्रविज्ञानाच्या युगात शालेय स्तरावर कितपत पाळले जातात.या संदर्भात असमाधान व्यक्त केले जाते.

## २) संशोधनाची उद्दिष्टे :—

प्रस्तुत संशोधन करण्यासाठी संशोधकाने खालील उदिष्टे निश्चित केली आहेत.

१) विद्यार्थ्यांना मराठीतील शुध्दलेखनाचे कोणते नियम माहित आहेत ते आजमावणे.(पूर्व चाचणी)
२) इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांच्या लेखनात कोणत्या चुका होतात यांचा शोध घेणे. ( पूर्व चाचणी)
३) विद्यार्थ्यांना मराठीतील शुध्दलेखनाच्या पाच नियमांची माहिति करून देणे. ( उपचार)
४) नियमांची माहिती दिल्यानंतर पडलेला फरक आजमावणे ( उत्तर चाचणी)

## ३) परिकल्पना :—

प्राथमिक शाळेतील इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांच्या मराठी लेखनात शुध्दलेखनाच्या चुका होतात.

## ४ गृहीतके :—

१) विद्यार्थ्यांच्या अनुस्वारासंबंधी चुका होतात.
२) विद्यार्थ्यांच्या ऱ्हस्व—दीर्घाच्या चुका होतो.
३) विद्यार्थी गावाच्या नावातील 'पूर' संबंधी चुका करतात.
४) विद्यार्थी मराठीतील एकेरी अक्षरांच्या चुका करतात.
५) विद्यार्थी मराठीतील इतर नियमांच्या संदर्भातही चुका करतात.

## ५) नमुना निवड :—

संशोधकाने बार्शी तालुक्यातील वैराग गावातील असंभाव्यता पध्दतीतील प्रासंगिक न्यादर्श नमुना निवड या पध्दतीचा वापर करून ७० विद्यार्थ्यांचा नमुना म्हणून संशोधनात निवड केली आहे.

## ६) संशोधन पध्दती :—

संशोधकाने पस्तुत संशोधनासाठी प्रायोगि संशोधन नपध्दतीचा वापर केला आहे.

## ७) संशोधनासाठी प्रायोगिक अभिकल्प :—

संशोधकाने संशोधनामध्ये अभिकल्प एक या प्रायोगिक अभिकल्पाचा उपयोग केला यामध्ये या गटास पूर्व चाचणी दिली, नंतर त्या गटास प्रायोगिक पध्दतीने ५ नियमासंदर्भात शिकविले व मध्यचाचणी दिली त्यानंतरही उपचारात्मक अध्यापन केले व उत्तर चाचणी दिली. त्यानंतर निष्कर्ष काढून शिफारशी करण्यात आल्या.

## ८)निष्कर्ष :–

संशोधकाने पूर्व चाचणी घेवून विद्यार्थ्यांच्या मराठी शुध्दलेखनातील चुका शोधल्या असता असे आढळून आले की, विद्यार्थ्यांच्या मराठी शुध्दलेखनात चुका होतात. पूर्वचाचणीनंतर सतत संशोधकाने ६ आठवडे विद्यार्थ्यांवर उपचारात्मक अध्यापन केले. यामध्ये संशोधन उदिष्टांना अनुसरून ५ नियम समजावून दिले. त्याची उदाहरणे विद्यार्थ्यांना दिली व विद्यार्थ्यांनाही काही उदाहरणे घरून आणण्यास सांगितले. संशोधकाने पूर्व चाचणी घेवून सतत ६ आठवडयात उपचारात्मक अध्यापन करून मध्य चाचणी व उत्तर चाचणी घेतली. या चाचण्यानंतर विद्यार्थ्यांच्या चुका कमी प्रमाणात झाल्याचे आढळले. संशोधनाचे निष्कर्ष पाहिले असता विद्यार्थ्यांमध्ये प्रगती झाल्याचे दिसून येते.

## ९) शिफारशी :–

१) विद्यार्थ्यांना व्याकरणाचे ज्ञान देण्यासाठी विविध मराठी व्याकरणची पुस्तके अभ्यासण्यास द्यावी.
२) विद्यार्थ्याकडून मराठी लेखनाचा जास्तीत जास्त सराव करून घ्यावा.
३) मुलांना दररोज सुविचार लेखन, म्हणी, वाक्यप्रचार व नवनवीन वाक्यरचनाआणखी करण्यास सांगावी.
४) वर्गामध्ये विद्यार्थ्याना घटक शिकवून झाल्यानंतर गृहपाठ द्याव व त्यांच्याकडून सतत लेखन करून घ्यावे.
५) विद्यार्थ्यांना दररोज १० ओळी शुध्दलेखन लिहून आणण्यास सांगावेत्र
६) विद्यार्थ्यांमध्ये निबंध लेखन, हस्ताक्षर स्पर्धा, शुध्दलेखन स्पर्धा ठेवावी.
७) विद्यार्थ्यमध्ये मराठी विषयी आवड निर्माण करण्यासाठी त्यांना गोष्टी सांगाव्यात, तज्ञ व्यक्तींची व्याख्याने आयोजि करावी.
८) विद्यार्थ्यांमध्ये मराठी विषयी आवड निर्माण करण्यासाठी त्यांना गोष्टी सांगाव्यात.
९) इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांना शुध्दलेखनाचे नियम व व्याकरण शिकविणे आवश्यक आहे.
१०) शुध्दलेखनासाठी दुरेगी वही आणावी.
११) शुध्दलेखनातील नियमानुसार पाठयपुस्तकातील शब्द शोधून विद्यार्थ्यांना लिहिण्यास सांगावे.
१२) शुध्दलेखनाच्या तयारीसाठी आठवडयातून एक स्वतंत्र तास असावा.
१३) विद्यार्थ्याकडून कठीण भाग पाठ करून घ्याव व जोडाक्षर लेखनांचा सराव करूनघ्यावा.
१४) चुकीचे शब्द ५ वेळा दुरूस्त करून लिहिण्यास सांगावे.
१५) शाळेमध्ये मुलांना शुध्दलेखनाबाबत कडक नियमांची अंमलबजावणी करण्यासंदर्भात कार्यवाही करावी.
१६) शासकीय स्तरावरून मुख्ध्यापकांनी मिटींग घेवून व मुख्याध्यापकांनी शिक्षकांची मिटींग घेवून विद्यार्थ्याकडून शुध्दलेखना संदर्भाम योग्य ती कार्यवाही करावी.

## संदर्भ ग्रंथ :–

१) संपादक, महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे मराठी व्याकरण, इयत्ता पाचवी, सहावी, सातवी.
२) गिरीधारी, भा. व्य ( ०१ मे १९८५ ), मराठी शुध्दलेखनाचा मार्ग, वि.भा.प्रकाशन, नाशिक.
३) गोखले, द.न. ( फेब्रुवारी १९९३) शुध्दलेखन विवके, सोहम प्रकाशान, पुणे.
४) बापट, भा. गो. (१९९५), शैक्षणिक संशोधन, नुतन प्रकाशन, पुणे – ३०.
५) भिंताडे, वि. रा. (सुधारित आवृत्ती जुलै १९९), शैक्षणिक संशोधन पध्दती, नूतन प्रकाशन, पुणे–३०
६) वाळंबे, मो.रा. (१९९६), मराठी शुध्दलेखन प्रदिप, नतुन प्रकाशन, पुणे – ३०
७) वाळंबे, मो.रा. (१९६३), सुगम मराठी व्याकरण, राणे गो.य. प्रकाशन.